# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र.एमओएम/२२७ दि.०२.०६.२०२३

विषय:-माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर करावयाची कार्यवाही.

संदर्भ:-१. परिपत्रक क्र.एमओएम/९७५८ दि.२२.०१.२००९
२. परिपत्रक क्र.एमओएम/१११९ दि.२५.०२.२०११
३. परिपत्रक क्र.एमओएम/१९७५ दि.१४.०९.२०११
४. परिपत्रक क्र.एमओएम/१३१० दि.२०.११.२०१२
५. परिपत्रक क्र.एमओएम/१६८३ दि.११.१२.२०१३
६. परिपत्रक क्र.एमओएम/१३५ दि.१७.०५.२०१४

उपरोक्त परिपत्रकान्वये जन माहिती अधिका-यांनी त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेले अर्ज काळजीपूर्वक वाचून व त्याचा मतीतार्थ जाणून अर्जदारास माहिती देण्याचा प्रयत्न करावा. ज्या ठिकाणी एखाद्या मुद्दयाचे स्पष्टीकरण आवश्यक वाटते, अशा वेळेस अर्जदारास दूरध्वनी किंवा पत्राने संपर्क साधून मुद्दा स्पष्ट करुन घ्यावा. ही कार्यवाही शक्यतो अर्ज प्राप्त झाल्यापासून 5 दिवसांत करावी. अर्ज किंवा त्याचा काही भाग हा दुस-या जन प्राधिकरणाशी संबंधित असल्यास तो अर्ज किंवा त्याचा भाग अधिनियमाच्या कलम ६(३) नुसार ५ दिवसांच्या आत संबंधित जन माहिती अधिका-याकडे पाठविण्यात यावा व तसे अर्जदारास तात्काळ कळविण्यात यावे असे निदेश देण्यात आले आहेत.

राज्य माहिती आयोगाकडून प्राप्त झालेल्या निदेशांची अंमलबजावणी करण्याकरिता सर्व जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना वेळोवेळी सूचना/निदेश देण्यात आलेले आहेत. तथापि, सदर सूचना निदेश यांचे पालन काटेकोरपणे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

यास्तव, जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे पुनश्च: निदेश देण्यात येत आहेत.

१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेला अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर खाते/विभाग यांच्याशी संबंधित असेल तर त्याबाबतीत माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(१) अंतर्गत पदनिर्देशित केलेल्या जन माहिती अधिकारी यांनी कलम ५(४) व ५(५) अन्वये कार्यवाही करावी. कलम ६(३) अन्वये अर्ज हस्तांतरित करु नये. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त झालेला अर्ज इतर सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित असेल तरच माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत६(३) प्रमाणे कार्यवाही करावी.

२) माहिती अर्जाची माहिती देताना करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर नाव,पत्ता,दूरध्वनी क्रमांक, ई-मेल इत्यादी न चुकता नमूद करावा.

३) माहिती नाकारण्यात आली असेल तर कोणत्या कारणास्तव नाकारण्यात आली आहे त्याचे कलम नमूद करण्यात यावे.

४) माहिती अधिकार अधिनियम,२००५ कलम ४(१) (क)(ख) अंतर्गत माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बेबसाईटवर प्रदर्शित करण्यात यावी. जेणेकरुन माहिती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत प्राप्त होणा-या अर्जांची संख्या कमी होईल.

५) अर्जदारास माहिती देताना मुद्देनिहाय माहिती देण्यात यावी. यापूर्वी परिपत्रक क्र.एमओएम/१११९ दि.२५.०२.२०११ व परिपत्रक क्र.एमओएम/१३५ दि.१७.०५.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

६) ज्यादिवशी अपील सुनावणी आयोजित केली असेल त्यादिवशी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी नियोजित वेळी कार्यालयात हजर रहावे.

सही/-१५.०५.२०२३
(रिमा ढेकणे )
प्रमुख कर्मचारी अधिकारी(प्र.)

सही/-१६.०५.२०२३
(मिलिन सावंत)
सह आयुक्त (सा. प्र.)

सही/-२२.०५.२०२३
(आशीष शर्मा)
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)

सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमओएम/२२७ दि.०२.०६.२०२३

<u>प्रकअ/१३</u>
२०२३-२४

प्रत:--------------------------------------------------------------------------------------------यांना
माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

लीनाशिंदे 02/06/2023
(श्रीम. लीना ता.शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी (आयुक्त कार्यालय)